RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग दोन

वर्ष ११, अंक ८०] बुधवार, ऑक्टोबर ८, २०२५/आश्विन १६, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक १८०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

सूचना

क्रमांक मऔविम/ आयएलपी/पी-२३७४२८/२०२५

[म.प्रा.व.न.र. अधिनियम कलम ११५ सह कलम ४० (३) (ड) अन्वये]

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.

ज्याअर्थी, शासनाचे उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची अधिसूचना म.औ.धो.-१९१६/प्र.क्र.२२१/उद्योग-२, दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ व क्र.म.औ.धो.-२०२३/प्र.क्र.२२३/उद्योग-२, दिनांक २६ ऑगस्ट २०२४ ची अधिसूचना अन्वये महाराष्ट्राचे लॉजिस्टीक धोरण जाहिर करणेत आले. (यापुढे उक्त धोरण असे नमूद केले आहे) ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कमीत कमी ५ एकर (२ हेक्टर) जमिनीवर व किमान १५ मी. रुंदीचा पोहोच रस्ता असलेल्या क्षेत्रावर एकात्मिक लॉजिस्टीक पार्क विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. टिपीबी-४३२२/३१४/सीआर -२५/२०२२ नवि-१३, दिनांक ०५ जुलै २०२३ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. १२.३ प्रमाणे अंमलबजावणी करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ४३ (१-ब) नुसार महामंडळ कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र(लॉजिस्टीक पार्क)" म्हणून अधिसूचीत करेल. तद्नंतर अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्रासाठी महामंडळ "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये काम करेल ;

आणि ज्याअर्थी, मे. सेन्ट्रल इंडिया लॉजिस्टीक प्रा.लि., यांच्या मौजे. मोहगांव (खु.), ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील ९.९१ हे.आर. क्षेत्राला दिनांक ०२ ऑगस्ट २०२४ रोजी संपन्न झालेल्या १६४ व्या उच्चाधिकार समितीची मान्यता मिळाली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांची अधिसूचना क्र. आय.डी.सी.२०२५/प्र.क्र.२६९/उद्योग-१४, दिनांक १० जुलै २०२५, अन्वये मौजे. मोहगांव (खु.), ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील ९.९१ हे.आर. क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम २ खंड (ग) अन्वये औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहिर केले आहे ;

आणि ज्याअर्थी मे. सेन्ट्रल इंडिया लॉजिस्टीक प्रा.लि., ह्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सदरील क्षेत्राचा प्रारुप विकास आराखडा मंजुरीस्तव सादर केला आहे आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ११५ सह कलम ४०(३) (ड) अन्वये उक्त एकत्रित क्षेत्राचा प्रारूप विकास आराखडा मंजूर करण्याआधी नागरिकांकडून सुचना/ हरकती मागविण्याकरिता नोटीस प्रसिद्ध करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सूचना क्र. मऔविम/आय.आय.ए.(लॉजिस्टीक पार्क)/ पी-२३७४३२/२०२५, दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ अन्वये मौजे मोहगांव (खु.), ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील ९.९१ हे.आर. इतक्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ४३-१ ब अंतर्गत "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र(लॉजिस्टीक पार्क)" म्हणून **महाराष्ट्र शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे दिनांक ८ऑक्टोबर २०२५ अन्वये जाहिर केले आहे ;

आणि ज्याअर्थी, मे. सेन्ट्रल इंडिया लॉजिस्टीक प्रा.लि., यांनी अर्जान्वये मौजे. मोहगांव (खु.), ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील अस्तित्वातील अधिसूचित ९.९१ हे.आर. क्षेत्राला एकात्मिक लॉजिस्टीक पार्क मध्ये समाविष्ट करण्याची महामंडळास विनंती केली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उक्त प्रारूप विकास आराखड्याची नोटीस उक्त अधिनियम अन्वये नागरिकांकडून सुचना/ हरकती मागविण्याकरिता **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** सदर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. उक्त नोटीसीची प्रत व एकात्मिक औद्योगिक क्षेत्राचा प्रारूप विकास आराखडा हा या नोटीसचा भाग समजण्यात यावा. सदरील नोटीस ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या *www.midcindia.org* या संकेत स्थळावर उपलब्ध राहील. तसेच नियोजन प्रस्ताव दर्शविणारा प्रारूप विकास आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या खालील कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध राहील.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पाचवा स्थर,

उद्योग सारथी, महाकाली गुंफा, मरोळ औद्योगिक वसाहत, अंधेरी (पूर्व),

मुंबई ४०० ०९३.

उक्त प्रारूप विकास आराखड्या संबंधी नागरिकांच्या काही सुचना/हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत मुख्य नियोजक, मऔविम यांच्या कार्यालयात खालील ठिकाणी लेखी स्वरूपात पाठवाव्यात . मुख्य नियोजक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पाचवा स्तर,उद्योग सारथी, महाकाली गुंफा, मरोळ औद्योगिक वसाहत, अंधेरी (पूर्व),मुंबई ४०० ०९३.

विहीत मुदतीत आलेल्या हरकती/ सुचना विचार करून शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/ सूचनाचा विचार केला जाणार नाही.

राजेंद्र पवार,

मुख्य नियोजक,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

मुंबई,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२५.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

(A Government of Maharashtra Undertaking)

NOTICE

No. MIDC/ ILP/P237428/2025

[u/s 115 read with sec. 40 (*3*) (*d*) of MR & TP Act, 1966]

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.

Whereas, Maharashtra Logistic Park Policy has been published by Government in Industries, Energy and Labour Department *vide* its Notification No. 1916/C.R.221/Industry-2, dated 14th February, 2018 and Notification No. म.औ.धो. 2023/प्र.क्र. 223 उद्योग-2,दिनांक 26th August 2024 (Herein referred as the said Policy) ;

And whereas, Government of Maharashtra has decided to implement the scheme of developing Integrated Logistic Parks on the admeasuring at least 5 Acres (2 Ha.) and having minimum 15 m wide access, in accordance with the Regulation No.12.3 of MIDCs CDCPR-2023 approved as per Urban Development, GoM notification No.TPB-4322/314/CR-25/2022/UD-11, dated 05/07/2023;

And whereas, as per section 43 (*1B*) of Maharashtra Industrial Development Act,1961, that subject to the general or specific directions of the State Government, the Corporation may, by notification in the *Official Gazette*, notify any industrial area as the 'Integrated Industrial Area' and upon such notification, the Corporation shall become the 'Special Planning Authority' for such 'Integrated Industrial Area' under the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 ;

And whereas, the High Power Committee in its 164th meeting held on 2nd August 2024 has approved the proposal of an Integrated Industrial Area (Logistics Park) proposed to be developed by, M/s. Central India Logistics Pvt. Ltd in Village- Mohgaon(Khurd), Tal. Nagpur(Rural), Dist. Nagpur. Accordingly, *vide* its, Notification No. IDC 2025/CR269/IND-14, dated 10th July, 2025 Industries Energy & Labour Department, Government of Maharashtra declared 9.91 Ha area of Village- Mohgaon(Khurd), Tal. Nagpur (Rural), Dist. Nagpur. to be an 'Industrial Area' under clause (*g*) of section 2 of Maharashtra Industrial Development Act, 1961;

And whereas, *vide* Notification No. MIDC/IIA(Logistic Park)/P237432/2025, dated 8th October 2025 of Maharashtra Industrial Development Corporation declared 9.91 HR Area at Village-Mohgaon(Khurd), Tal. Nagpur(Rural), Dist. Nagpur to be an 'Integrated Industrial Area(Logistic Park)' under clause (1B) of sec. 43 of Maharashtra Industrial Development Act, 1961 which is published in *Maharashtra Government Gazette* on date 8th October 2025 ;

And whereas, M/s. Central India Logistics Pvt. Ltd., made an application requesting Maharashtra Industrial Development Corporation to approve their proposed Draft Master Plan area admeasuring 9.91 Ha of notified 'Integrated Industrial Area(Logistic Park)' in Village- Mohgaon(Khurd), Tal. Nagpur(Rural), Dist. Nagpur ;

And whereas, as provided in Section 115 read with 40(3)(d) of the Maharashtra Regional Town Planning Act, 1966, it is necessary to publish the Draft Master Plan for inviting suggestions and objections from the citizen.

Therefore, Maharashtra Industrial Development Corporation hereby publishes the Notice in *Government Gazette* for Draft Master Plan for inviting suggestion/objections from citizen. The copy of this notice and proposed Draft Master Plan of notified Integrated Industrial Area shall form part of this notice. The notice is made available on the *website* of MIDC i.e *www.midcindia.org*. The Proposed Draft Master Plan of the Notified Integrated Industrial Area is kept open for citizen's inspection during office hours at the following office:

Chief Planner,
Maharashtra Industrial Development Corporation,
Udyog Sarathi, Mahakali Caves Road, Andheri,
Mumbai 400 093.

The Suggestions/objections if any, in writing shall be submitted to the Chief Planner of Maharashtra Industrial Development Corporation, Udyog Sarathi, Mahakali Caves Road, Andheri, Mumbai- 400 093 within the period of 10 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette*. Suggestions/objections received within stipulated period of 10 days from the date publication of the Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

RAJENDRA PAWAR,
Chief Planner,
Maharashtra Industrial Development Corporation.

Mumbai,
dated 8th October 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.